


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ८८, बुधवार २६ फेब्रुवारी २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# मायडीयाचा पंकज यादव लिंगपिसाट!

## वर्कमॅन ऋषीपालसिंगही बाईलवेडा ■ म्हसणे फाटा वसाहतीमध्ये पंकजची यादवी ■ सुपा पोलीस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल

म्हसणेफाटा : विशेष प्रतिनिधी

**कॅरिअर मायडीया या बहुराष्ट्रीय कंपनीचा एच.आर. पंकज यादव हा लिंगपिसाट निघाला असून त्याने कंपनीमध्ये काम करणाऱ्या महिला सुरक्षा रक्षकाचा विनयभंग करत स्वतःच्या पदासह कंपनीच्या नावलौकीकास काळीमा फासला आहे. दरम्यान याच कंपनीतील वर्कमॅन ऋषीपालसिंग हा देखील बाईलवेडा असल्याचे पुढे आले असून त्याच महिला सुरक्षा रक्षकाचा त्यानेही विनयभंग केला आहे. पंकज यादव व ऋषीपालसिंग या दोघांविरोधात सुपा पोलीस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

यासंदर्भात पीडित महिलेने सुपा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार गेल्या दिड वर्षांपासून पिडीत महिला कॅरीअर मायडीया या कंपनीमध्ये सुरक्षा रक्षकाचे काम करत होती. सकाळी सात वाजता केडगांव, नगर येथून कंपनीच्या बसमधून म्हसणे फाटा येथील एमआयडीसीमध्ये येऊन दुपारी साडेतीन वाजता ही महिला केडगाव येथे परतत असे.

केडगांव येथे वर्कमॅन ऋषीपालसिंग हा देखील वास्तव्यास आहे. तो देखील कंपनीच्या बसने सकाळी सात वाजता औद्योगिक वसाहतीमध्ये येत असे. दि.१६ नोव्हेंबर २०२४ रोजी ऋषीपालसिंग याने पिडीत महिलेस महिलांच्या स्वच्छतागृहाजवळ बोलवून तिला पैसे देऊ उर्वरीत पान ३ वर






### दाद न दिल्याने कामावरून काढून टाकले

पंकज यादव व ऋषीपालसिंग हे दोघे कंपनीमध्ये चांगल्या पदावर असल्याने दोघेही पिडीतेस नोकरीवरून काढून टाकण्याची धमकी देत होते. पिडीत महिलेने दोघांनाही दाद न दिल्याने त्या महिलेस कोणतेही कारण न देता कामावरून काढून टाकण्यात आले.

### इतरांवरही अत्याचार ?

नोकरी, पैशांचे आमिष दाखवून इतर अनेक महिलांवर अत्याचार करण्यात आल्याची कुजबूज म्हसणेफाटा औद्योगिक वसाहत परिसरात सुरू आहे. भितीपोटी अनेक पिडीत महिलांनी तक्रार देण्याचे धाडस केले नसले तरी या पिडीत महिलेने धाडस केल्याने औद्योगिक वसाहतीमधील महिलांच्या सुरक्षेवर प्रकाश पडला आहे.

### वसाहतीवर वर्चस्वाचा प्रयत्न

कॅरीअर मायडीया ही मल्टीनॅशनल कंपनी म्हसणे फाटा औद्योगिक वसाहतीमध्ये सुरूवातीस उभारली गेली. त्यानंतर इतर कंपन्यांची उभारणी होउन त्या सुरू झाल्या. सुरूवातीपासून यादव हा म्हसणे फाटा येथे असल्याने तसेच कॅरीअर मायडीया ही नामांकित कंपनी असल्याने इतर कंपन्यांमध्येही यादव हा स्वतःच्या मजतील एच आर यांची नेमणूक करून घेत असे. त्या कंपनीच्या एच आरला हाताशी धरून त्या कंपन्यांच्या ठेकेदारीवरही तो अंकुश ठेवत असे. एकंदरीतच संपूर्ण औद्योगिक वसाहतीवर पंकज यादव हा स्वतःचे वर्चस्व निर्माण करू पाहत होता. सुपा पोलीस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल झाल्याने यादवच्या यादवीला चाप बसेल अशी अपेक्षा आहे.

### यादवची पार्टनरशिप

कॅरिअर मायडीया तसेच म्हसणे फाटा येथील इतर कंपन्यांच्या कॉन्ट्रक्टमध्ये एच आर पंकज यादवची पार्टनरशीप असल्याचीही माहीती पुढे आली आहे. त्यामुळे कॅरिअर मायडीया कंपनीमध्ये यादव स्वतःच्या मजतील ठेकेदारालाच कॉन्ट्रक्ट देत असे. त्यावरून स्थानिक तरूण व पंकज यादव यांच्यात अनेकदा वाद झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

# प्रधानमंत्री सहाय्यता निधीत खा. नीलेश लंके एक नंबर!

## ■ खा. लंकेंनी स्वतःसह शरद पवारांचाही कोटा संपविला ■ मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्येही खा. लंकेच अव्वल

नवी दिल्ली : प्रतिनिधी

**प्रधानमंत्री राष्ट्रीय आरोग्य निधीचा राज्यात सर्वाधिक रूग्णांना लाभ मिळवून देत खासदार नीलेश लंके यांनी नवी दिल्लीमध्येही आपल्या कामाची चुणूक दाखविली आहे. दरवर्षी प्रत्येक खासदाराला असलेला ३५ केसचा कोटा संपल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष  शरद पवार यांच्या कोटयातून २७ केसेससाठी निधी मिळवत नीलेश लंके हे सर्वाधिक रूग्णांना लाभ मिळवून देणारे खासदार ठरले आहेत.**

पाच वर्षांपूर्वी विधानसभेत पारनेर-नगर मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करताना खा. नीलेश लंके यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा राज्यात सर्वाधिक रूग्णांना लाभ मिळवून दिला होता. त्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिकृतपणे नीलेश लंके यांनी या योजनेचा राज्यात सर्वाधिक रूग्णांना लाभ मिळवून दिल्याचे जाहीर केले होते.

उर्वरीत पान ३ वर



### हजारो रूग्णांना मदतीचा हात

कोणत्याही योजनेमार्फत प्रस्ताव सादर केल्यानंतर त्याचा पाठपुरावा करण्यासाठी खा. लंके यांच्या पारनेर,नगर, दिल्ली येथील संपर्क कार्यालयात स्वतंत्र यंत्रणा असून या यंत्रणेमार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांचा दररोज आढावा घेतला जातो. प्रस्तावात काही तृटी असतील तर संबंधित रूग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांशी संपर्क करून त्रृटी दुर केल्या जातात. आरोग्याच्या मदतीसाठीची यंत्रणा सतर्क असल्याने गेल्या पाच, साडेपाच वर्षात हजारो रूग्णांना आजवर लंके यांच्या माध्यमातून मदत मिळाली आहे.


### रूग्णसंख्येची मर्यादा नको

खा. नीलेश लंके हे संसदेत गेल्यानंतर त्यांचा ३५ रूग्णांचा कोटा काही महिन्यात संपला. त्यामुळे त्यांनी पाठविलेले प्रस्ताव प्रधानमंत्री कार्यालयाकडे पडून होते. त्यासाठी प्रत्येक खासदारासाठी दरवषसाठी घालण्यात आलेले ३५ रूग्णांचे बंधन दुर करून अमर्याद रूग्णांना मदत देण्याची मागणी खा. लंके यांनी यापूर्वीच संसदेत केली आहे.

### १ कोटी ८६ लाख रूपयांची मदत

खासदार नीलेश लंके यांच्या कोटयातील ३५ तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या कोटयातील २८ अशा एकूण ६३ रूग्णांना आजवर १ कोटी ८६ लाख रूपयांची मदत मिळवून देण्यात आली आहे.



# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या



# डार्क ऑक्सिजन!

**प्रशांत महासागरातील क्लेरियन-क्लिपरटन झोन (सीसीझेड) हे एक गूढ क्षेत्र आहे. हा झोन म्हणजे सुमारे ४५ लाख चौरस किलोमीटरचा आहे. हे क्षेत्र सागरी जीवसृष्टी आणि खनिजसंपत्ती यांसाठी प्रसिद्ध आहे. या भागात पॉलिमेटॅलिक नोड्यूल्स म्हणजेच मौल्यवान धातूंचे खडक मोठ्या प्रमाणात आढळतात. या नोड्यूल्समध्ये मुख्यतः मँगनीज, लोखंड, निकेल, तांबे आणि कोबाल्ट ही मौल्यवान खनिजे आहेत. विशेष म्हणजे या नोड्यूल्समध्ये डार्क ऑक्सिजन तयार होतो. सूर्यप्रकाशाशिवाय निर्मिती होणाऱ्या या ऑक्सिजनमुळे पृथ्वीवरील जीवनाच्या सुरुवातीबद्दल शास्त्रज्ञांच्या संकल्पना बदलू शकतात, असे मानले जाते.**

स्कॉटिश असोसिएशन फॉर मरीन सायन्समधील प्रा. अँड्रू स्वीटमन यांच्या नेतृत्वाखालील संशोधकांच्या टीमने प्रशांत महासागरातील सीसीझेडमधील 'डार्क ऑक्सिजन' निर्मितीची प्रक्रिया शोधली आहे. ही प्रक्रिया सूर्यप्रकाशाशिवाय, सुमारे ४ हजार मीटर खोल समुद्राच्या तळाशी घडते. डार्क ऑक्सिजनचा शोध घेताना दहा वर्षांपेक्षा अधिक काळ लागला आहे. स्कॉटिश असोसिएशन फॉर मरीन सायन्सचे अँड्रू स्वीटमन आणि बोस्टन विद्यापीठाच्या तज्ज्ञांनी खोलवर जाताना पाण्यातील ऑक्सिजनची पातळी कशी कमी होते, हे पाहण्यासाठी एक मशीन चार हजार मीटर (तेरा हजार फूट) खाली सोडले. परंतु समुद्रसपाटीवर ऑक्सिजनचे प्रमाण वाढल्याचे संशोधकांच्या निदर्शनास आले. ऑक्सिजन कमी न होता ते अधिक असल्याचे पाहून स्वीटमन आणि त्यांच्या टीमला आश्चर्याचा धक्का बसला. या संशोधन मोहिमेचा उद्देश मुळातच क्लेरियन क्लिपरटनच्या झोनमध्ये वावरणाऱ्या जीवांनी ऑक्सिजन किती वापरला आहे, हे समजून घेण्याचा होता. अर्थात ऑक्सिजन जमिनीवर मिळतो, हा सर्वसाधारण समज होता. खोल समुद्रात असलेला ऑक्सिजन हा समुद्र आणि जमिनीच्या वरच्या भागातून येत असल्याचे शास्त्रज्ञांना वाटत होते. पण अभ्यासातून वेगळेच तथ्य समोर आले. डार्क ऑक्सिजनची निर्मिती वनस्पती, प्लँक्टन आणि एकपेशीय वनस्पती प्रकाश संश्लेषणाच्या प्रक्रियेतून करतात. साधारणपणे जसजसे आपण पाण्यात खोलवर जातो, तसतसे ऑक्सिजनची पातळी कमी होते. मात्र, या प्रकरणात तसे घडले नाही. या ठिकाणी ऑक्सिजनची पातळी वाढलेली दिसली.

## ऑक्सिजन निर्मिती

**सागरी** खडकांमध्ये असलेल्या धातूंच्या ऑक्सिडेशनमुळे ऑक्सिजन तयार होतो. समुद्राच्या तळाशी असलेल्या उष्ण झऱ्यांमधून होणाऱ्या वायूंच्या मिश्रणामुळेही ऑक्सिजन तयार होतो. याशिवाय समुद्रतळाशी राहणाऱ्या विशिष्ट सूक्ष्मजीवांच्या प्रक्रियांमधूनही ऑक्सिजन तयार होतो. या शोधामुळे पृथ्वीवरील जीवनाच्या उत्पत्तीबद्दल नवीन दृष्टिकोन समोर येत आहेत. प्रा. स्वीटमन यांच्या मते, पृथ्वीवरील जीवनाच्या सुरुवातीसाठी ऑक्सिजन आवश्यक होता आणि आपला असा समज होता की पृथ्वीवरील ऑक्सिजनचा पुरवठा प्रकाशसंश्लेषण करणाऱ्या जीवांमुळे सुरू झाला. पण आता स्पष्ट झाले आहे की, प्रकाशाशिवायही खोल समुद्रात ऑक्सिजन तयार होतो. या शोधामुळे खोल समुद्रातील परिसंस्थांवरील मानवी क्रियाकलापांच्या परिणामांबद्दलही नवीन प्रश्न उपस्थित झाले आहेत. विशेषतः पॉलिमेटॅलिक नोड्यूल्सच्या उत्खननामुळे या 'डार्क ऑक्सिजन' निर्मिती प्रक्रियेवर आणि संबंधित सागरी जीवसृष्टीवर काय परिणाम होईल, याबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे.

## तर तो जगाचा नायक

**प्रशांत** महासागरातील खोलवर समुद्रात खनिज शोधण्यासाठी भारताला परवाना हवा आहे. १९८७ मध्ये 'लीड इन्व्हेस्टर'चा दर्जा मिळणारा भारत हा पहिला देश होता आणि त्याला मध्य हिंद महासागराच्या पात्रात असलेल्या पॉलिमेटॅलिक नोड्यूलचे विश्लेषण करण्यासाठी सुमारे दीड लाख चौरस किलोमीटरचे क्षेत्र देण्यात आले. अमेरिका, चीनमध्येही या भागात खाणकामासाठी स्पर्धा सुरू झाली. त्यामुळे या डार्क ऑक्सिजनसारख्या स्रोतांवर ज्याचे राज्य असेल तो जगाचा नायक असेल, असे म्हटले जाते. शिवाय भारताने अलीकडेच कोबाल्ट समुद्र अफसानी निकितिन सी-माउंटसह (एएन सी-माउंट) हिंद महासागरातील सागरी हद्दीच्या बाहेर संशोधन अधिकारासाठी अर्ज केला आहे. सी-माउंट म्हणजे खोल समुद्रात चढउतार असलेले पर्वत. हे पर्वत ज्वालामुखीच्या क्रियेमुळे तयार झालेले असतात. हिंद महासागरातील स्रोतांचा शोध घेण्यासाठी आणि खाणकाम करण्यासाठी भारत त्याच्या 'डीप ओशन मिशन'चा एक भाग म्हणून सबमर्सिबल वाहन तयार करत आहे.

## आधी उपकरणावरच घेतला संशय...

प्रारंभी शास्त्रज्ञ स्वीटमन यांना उपकरणाचे सेन्सर खराब झाल्याचे वाटले, परंतु तपासणी पुन्हा केल्यानंतर ते व्यवस्थित काम करत असल्याचे आढळून आले. आपल्याला गरजेचा असलेला ५० टक्के ऑक्सिजन समुद्र तयार करतो. ऑक्सिजन



निर्माण करणारे घटक एकूण कार्बन डायऑक्साइडच्या उत्सर्जनाच्या २५ टक्के भाग शोषून घेतात. एवढेच नाही तर कार्बन उत्सर्जनामुळे होणारी ९० टक्के अतिरिक्त उष्णता समुद्राचे पाणी शोषून घेते. त्यामुळे ते सर्वात मोठे कार्बन सिंक असून हवामान बदलाने होणाऱ्या परिणामाविरुद्ध ढाल म्हणून समोर आले आहे. खोल समुद्रात असलेल्या काही विशिष्ट खडकांवर जीवाणूंच्या जैवरासायनिक प्रक्रियांमधून ऑक्सिजन तयार होतो. ही प्रक्रिया मुख्यतः रासायनिक अभिक्रियांवर आधारित असते.

# चिमुकल्यांचं 'सोशल'पण अन् धोके!

**सध्या संपूर्ण जगातच सोशल मीडियाचा वापर प्रचंड वाढला आहे. याचे काही दुष्परिणाम देखील पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वीच ऑस्ट्रेलियाने १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया वापरण्यावर बंदी घातली आहे. त्यातच आता भारतात देखील लहान मुलांच्या सोशल मीडिया वापरण्यावर काही प्रतिबंध येण्याची शक्यता आहे. १८ फेब्रुवारीनंतर याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याचं सांगितलं आहे. लोकांचा अभिप्राय घेऊन यावर केंद्रसरकार निर्णय घेणार आहे.**

१८ वर्षांखालील लहान मुलांना आता सोशल मीडियावर अकाउंट उघडण्यासाठी पालकांची परवानगी घेणे आवश्यक असेल. डेटा प्रोटेक्शन २०२५ (Digital Personal Data Protection Rules, 2025) च्या नवीन मसुद्यामध्ये या नियमांचा उल्लेख आहे. यामुळे कंपन्यांना पालकांची मंजुरी मिळत नाही तोपर्यंत लहान मुलांच्या डेटाचा वापर अथवा स्टोर करता येणार नाही. दरम्यान, असं असलं तरी दुसरीकडे मात्र चित्र काहीस वेगळंच असल्याचं दिसून येत. मुलं जरी सोशल मीडियावर पासून लांब जात असले तरी त्यांचे पालक मात्र, आपल्या मुलांना फेसबुक, इंस्टाग्राम, आणि इतर माध्यमांसमोर घेऊन जात आहेत. थोडक्यात बोलायचं तर, स्वतः पालकच आपल्या मुलांचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात शेअर असतात.

प्रत्येक मुलं आपल्या पालकांच्या आयुष्याचा महत्त्वाचा भाग असते. त्यांचा निरागस आणि खोडकरपणा पाहून एक वेगळाच आनंद मिळतो. अशा सुंदर क्षणांची जपणूक करण्यासाठी पालक अनेकदा मुलांचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करतात, किंवा स्टेटसला ठेवतात, असे कंटेट यूजर्सना खूप आवडते. पण लाईक्स आणि व्ह्यूजच्या नादात आपल्या मुलांची वैयक्तिक ओळख (प्रायव्हसी) कुठंय तरी जगासमोर येत आहे आणि हे कितपत सुरक्षित आहे? याचा तुम्ही कधी विचार केला आहे का ! या प्रकाराला 'शेरेंटिंग' असं म्हंटलं जात म्हणजे 'शेअर आणि पालकत्व'.



## सावधगिरी कशी बाळगावी?


- गोपनीयता सेटिंग्ज वापरा : तुमच्या सोशल मीडिया प्रोफाइलवरील गोपनीयता सेटिंग्ज 'फक्त मित्रांसाठी' ठेवा.
- फोटो निवडून शेअर करा : प्रत्येक फोटो शेअर करण्याआधी विचार करा की तो फोटो सार्वजनिक व्हावा का.
- लोकेशन टॅगिंग टाळा : फोटो शेअर करताना लोकेशन टॅगिंग बंद ठेवा.
- मुलांची परवानगी घ्या : फोटो शेअर करण्याआधी मुलांची आणि घरच्यांची परवानगी घ्या.
- सायबर सिक्युरिटीबद्दल जागरूकता ठेवा : सोशल मीडियाचा सुरक्षित आणि जबाबदारीने वापर करा.

## सावधगिरी हवीच

सोशल मीडियावर लहान मुलांचे फोटो शेअर करताना काही इमोजींचा (स्टिकर्स) वापर करा, अनेक कलाकार मंडळी आपल्या मुलांचे फोटो शेअर करताना अशा पद्धतीचा वापर करतात. इमोजीचा वापर करताना मुलांचा चेहरा दिसणार नाही याची काळजी नक्की घ्या. सोशल मीडियावर लहान मुलांचे फोटो शेअर करणे आकर्षक वाटत असले तरी, त्यांच्या सुरक्षिततेसाठी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. पालकांनी आणि नातेवाईकांनी जबाबदारीने वागून मुलांच्या गोपनीयतेचे आणि सुरक्षा हक्कांचे रक्षण करावे. अन्यथा आपणच आपल्याला मुलाला एखाद्या मोठ्या संकटात अडकून ठेऊ आणि यातून बाहेर पडणे देखील कठीण होऊन बसेल. त्यामुळे सर्वात आधी स्वतः पालकांनीच जागरूक होणे गरजेचे आहे.

## लाईक्स आणि व्ह्यूजच्या नादात गंभीर परिणाम

- मुलांचे भविष्य : इंटरनेटवर काहीही पोस्ट केल्यानंतर, ते काढून टाकणे खूप कठीण आहे. लोक ऑनलाइन शेअर केलेल्या गोष्टींचे स्क्रीनशॉट घेतात. लहान मुलांचा कोणताही फोटो किंवा व्हिडीओ शेअर करताना आपलं मूल मोठं झाल्यावर त्याच्यावर किती परिणाम होऊ शकतो याचा नक्कीच विचार करा. अन्यथा मुलांना लाजिरवाणी गोष्टींचा सामना करावा लागेल.
- ऑनलाइन किडनॅपिंग : तुमच्या मुलाचे ऑनलाइन किडनॅपिंग होऊ शकते, म्हणजेच फक्त मुलाचे फोटो आणि व्हिडिओ दुसऱ्या नावाने आणि ओळखीसह वापरले जाऊ शकतात. त्यामुळे हे मुलं आमचं असल्याचं देखील दावा इतर लोक करू शकतात.
- सायबर बुलिंग : तुमच्या मुलांना थेट सायबर बुलिंगचा सामना करावा लागेल. फोटो किंवा व्हिडीओ पाहून मुलांना चिडवले जाते. नकारात्मक कमेंट्स केल्या जातात. उंची आणि रंग यावर देखील भाष्य केलं जात. ज्यामुळे मुलांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. तुमचं मुलं मानसिक दृष्ट्या खचून जाऊ शकत.
- अश्लील कंटेट : काही लोक चुकीच्या मार्गाने सोशल मीडियावर शेअर केलेल्या फोटोंचा फायदा घेतात. त्यांना चाइल्ड पोर्नोग्राफीचे वेड असते. असे लोक लहान मुलांचे फोटो आणि व्हिडीओ एडिट करून आक्षेपार्ह वेबसाईट्स किंवा फोरमवर पोस्ट करतात. हा खूपच खतरनाक प्रकार आहे.
- डिजिटल फूटप्रिंट कायम राहते : एकदा फोटो आणि व्हिडिओ इंटरनेटवर अपलोड झाल्यावर, तो कायमचा डिजिटल फूटप्रिंटचा भाग होतो. भविष्यात मुलांच्या परवानगीशिवाय तो फोटो, व्हिडिओ कुठेही दिसू शकतात.
- मुलांचे अपहरण होऊ शकते : मुलांची व्यक्तिगत माहिती (नाव, शाळेचे नाव, लोकेशन) फोटोमधून सहज मिळू शकते. त्यामुळे मुलांचे अपहरण होण्याची शक्यता असते. तसेच फोटो कोणत्याही अज्ञात व्यक्तींकडून डाऊनलोड किंवा चुकीच्या हेतूसाठी वापरले जाऊ शकतात. त्यामुळे सावधगिरी बाळगली पाहिजे.



## मुलांचे फोटो शेअर किंवा स्टेटसला ठेवताय?

जेव्हा मुलं शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या मोठी होत असतात. ते गोष्टी समजून घेण्याची आणि स्वतःशी जोडण्याची क्षमता विकसित करतात. अशा वेळी, त्यांचे फोटो किंवा रील शेअर केल्याने त्यांच्या प्राइव्हसीपासून त्यांच्या वागण्यापर्यंत सर्व गोष्टींवर परिणाम होऊ शकतो. मुलांशी संबंधित चुकीचा मजकूर पोस्ट करणे इंटरनेटच्या जगात धोकादायक ठरू शकते. त्यांच्या भविष्यावरही नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

## सोशल मीडियावरील नियम


फेसबुक, इन्स्टाग्राम आणि युट्युब यांसारख्या प्लॅटफॉर्मवर अश्लीलता, हिंसा किंवा बालशोषणाशी संबंधित सामग्री शेअर करणे निषिद्ध आहे. अशा प्रकारची सामग्री प्लॅटफॉर्मवर आढळल्यास ती लगेच हटवली जाते आणि संबंधित व्यक्तीवर कारवाई केली जाऊ शकते. त्यांचे सोशल मीडिया अकाउंट देखील बंद होऊ शकते.

## कायदा काय सांगतो?

जगभरात लहान मुलांच्या फोटोंचे सोशल मीडियावर शेअरिंगसंदर्भात थेट कायदे नसले तरी, मुलांच्या गोपनीयतेचे आणि अधिकारांचे संरक्षण करणारे अनेक कायदे आणि नियम लागू होतात. यामध्ये मुलांच्या हक्कांसह त्यांचा गैरवापर होऊ नये याची काळजी घेतली जाते. भारतामध्ये 'पॉक्सो' हा बाल लैंगिक शोषण रोखण्यासाठी कायदा आहे. पॉक्सो कायद्यानुसार, १८ वर्षांखालील सर्व मुलं बालक या श्रेणीत येतात आणि त्यांचं लैंगिक शोषण गंभीर गुन्हा मानला जातो. जर मुलांचा फोटो सोशल मीडियावर शेअर केला आणि तो अश्लीलतेसाठी वापरण्यात आला, तर हा कायद्याचा भंग मानला जातो.

# पॉवर बँक खरेदी करताय?

**स्मार्टफोनचा वापर खूप वाढला आहे. फोनची आवश्यकता सर्वत्र आणि जवळजवळ प्रत्येक कामासाठी असते. पण कधीकधी अशी परिस्थिती उद्भवते जेव्हा आपण फोन चार्ज करू शकत नाही. याचे कारण वीज खंडित होणे किंवा फोन चार्ज करण्याची सुविधा नसणे. अशा परिस्थितीत लोक पॉवर बँक वापरतात. हे देखील एक उपकरण आहे जे आजच्या काळात अत्यंत महत्वाचे आहे. याद्वारे फोन वीजेशिवाय कुठेही चार्ज करता येतो. तथापि, पॉवर बँक खरेदी करताना, तुम्हाला काही गोष्टींची काळजी घ्यावी लागेल, ज्याबद्दल आम्ही तुम्हाला येथे सांगत आहोत...**




- पॉवर बँकची क्षमता : पॉवर बँक खरेदी करताना, तुम्ही तुमच्या फोनच्या बॅटरी क्षमतेपेक्षा सुमारे अडीच पट जास्त क्षमता असलेली पॉवर बँक खरेदी करावी. जेणेकरून तुमचा फोन दोनदा पूर्ण आणि एकदा ५० टक्क्यांपर्यंत चार्ज करता येईल. उदाहरणार्थ जर तुमच्या फोनची बॅटरी ५००० mAh असेल तर तुम्ही १०००० ते १५००० mAh बॅटरी असलेली पॉवर बँक खरेदी करावी.
- चार्जिंग पॉइंटकडे लक्ष द्या : पॉवर बँक खरेदी करताना, तुम्हाला त्याच्या चार्जिंग पॉइंटकडे देखील लक्ष द्यावे लागेल. बाजारात अशा अनेक पॉवर बँक आहेत जे फक्त USB केबलने काम करतात. जर तुम्ही अशी पॉवर बँक खरेदी केली तर तुम्हाला तुमचा फोन चार्ज करण्यात समस्या येऊ शकतात.
- किती डिव्हाइस चार्ज होतील? : तुम्ही खरेदी करत असलेली पॉवर बँक एकाच वेळी किती उपकरणे चार्ज करू शकते हे लक्षात ठेवले पाहिजे. कमीत कमी अशी पॉवर बँक तरी असावी ज्याच्या मदतीने तुम्ही एकाच वेळी दोन फोन चार्ज करू शकाल.
- व्होल्टेज : पॉवर व्होल्टेज अत्यंत महत्वाचे आहे. जर तुम्ही खरेदी केलेल्या पॉवर बँकचा आउटपुट व्होल्टेज तुमच्या फोनच्या व्होल्टेजइतका नसेल तर फोन चार्ज होऊ शकणार नाही. अशा परिस्थितीत, तुम्हाला फोन सारख्याच आउटपुट व्होल्टेजसह पॉवर बँक खरेदी करावी लागेल.

## शॉर्ट न्यूज

### हद्दपार आदेशाचा भंग केल्याने बेड्या

■ **नगर :** हद्दपार आदेशाचा भंग करणाऱ्या गुन्हेगाराला तोफखाना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सोमनाथ भानुदास गिते (वय २८ रा. निर्मलनगर, भगवानबाबा चौक, सावेडी) असे ताब्यात घेतलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, त्याने यापूर्वी देखील हद्दपार आदेशाचा भंग केला आहे. त्यावेळी त्याला एलसीबी पथकाने ताब्यात घेतले होते. पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना पोलीस पथकाला केल्या होत्या.

### खून प्रकरणात ६ आरोपींना जन्मठेप

■ **राहाता :** शहरातील योगेश किसन वाघमारे या तरुणावर धारदार शस्त्राने वार करून जीवे ठार मारल्याच्या गुन्ह्यातील १८ पैकी ६ आरोपींना जन्मठेप व प्रत्येकी ३५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. तर उर्वरित १२ आरोपींना निर्दोष सोडले. श्रीरामपूर येथील एका हॉटेलात झालेल्या भांडणाच्या कारणावरून राहाता येथील फिर्यादी किसन वाघमारे यांचा मुलगा योगेश किसन वाघमारे रा. राहाता यास आरोपी ललित पाळंदे, राहुल धीवर यांनी त्याला मोटरसायकलवरून पळवून नेवून आंबेडकरनगर मधील संजय दादा निकाळे यांच्या घरी नेले.

### जलजीवन योजनेचे काम रखडले

■ **नेवासा :** तालुक्यातील मुकिंदपूर आणि इतर सात गावांसाठी नियोजित प्रादेशिक पाणीपुरवठा योजना रखडल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. ही योजना एप्रिल २०२४ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा होती. मात्र, अनेक अडथळ्यांमुळे या योजनेच्या कामाला अजूनही एक वर्ष लागण्याची शक्यता आहे. परिणामी, गावकऱ्यांना २०२५ च्या उन्हाळ्याऐवजी २०२६ च्या उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याचा लाभ मिळेल. मात्र, नियोजित वेळेत काम न झाल्याने ठेकेदाराला दंड होणार असल्याचे बोलले जात असले तरी अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.

### आवर्तनातून बंधारे, तलाव भरा

■ **श्रीगोंदा :** तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या कुकडी धरणाच्या चालू आवर्तनातून श्रीगोंदा तालुक्यातील लहान-मोठ्या बंधाऱ्यांमध्ये व पाझर तलावांमध्ये पाणी सोडण्याची मागणी पाटपाणी कृती समितीचे अध्यक्ष राजेंद्र म्हस्के यांनी केली आहे. या मागणीसाठी त्यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली. संपूर्ण परिस्थितीचा विचार करून या रोटेशनमधून पाझर तलाव, बंधारे भरून द्यावेत. त्याचबरोबर टेलच्या शेतकऱ्यांना पाणी मिळेल, असे नियोजन करा, अशी मागणी जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्याकडे करण्यात आली आहे.

### शेतबांधावरून दोन गटांत हाणामारी

■ **संगमनेर :** तालुक्यातील पानोडी येथे शेताच्या बांधावरून दोन गटांत मारहाण झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी आश्वी पोलिसांत परस्परविरोधी फिर्यादींवरून गुन्हा दाखल झाला आहे. पानोडी येथील प्रियंका संदीप कराड (वय ३५) यांच्या घरी मळ्यातील बांधाचे गवत पेटवण्याच्या कारणावरून कुरापत काढत चुलत सासरे कैलास पांडुरंग कराड, प्रियंका संदीप कराड, मावळण सासू हिराबाई जनार्दन ओंबासे, विमल दगडू सांगळे, सुशीला बबन कराड, कमला कराड यांना लाकडी काठीने, हातोडी तसेच लोखंडाच्या गजाने मारहाण केली.

# साहित्यिकांच्या सहवासामुळे मी घडलो !

■ साहित्यिक विलास सातपुते यांचे व्याख्यान
■ शिरूरला डॉ.बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला



**शिरुर : प्रतिनिधी**

**साहित्यिकांच्या सहवासामुळे आपले आयुष्य समृध्द झाले व आपल्यातील साहित्यिक घडला, असे साहित्यिक विलास सातपुते यांनी सांगितले.**

बहि:शाल शिक्षण मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व चांदमल ताराचंद बोरा कॉलेज येथे डॉ.बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेत साहित्यिक विलास सातपुते यांचे मराठी साहित्यिकांचा सहवासात या विषयांवर व्याख्यान झाले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ . के. सी मोहिते होते.

सातपुते पुढे म्हणाले की, आपणांस साहित्यिक बळवंत देशमुख, द. ता. भोसले यांच्या सहवास लाभला. शिक्षकांमुळे आपण मोठे होतो. सन १९६३ मध्ये सातारा येथे साहित्य संमेलनात स्वंयसेवक म्हणून काम करता आले. त्यावेळी साहित्यिक प्र. के.अत्रे यांच्या तीन दिवसाचा सहवास लाभला. यावेळी त्यांनी माझे नाव विगसा असे ठेवले. साहित्यिकांचा सहवासातूनच मी कविता लिहू लागलो. नवोदित साहित्यिकांनी प्रस्थापित साहित्यिकांच्या सहवासात राहा त्यातून तुम्ही समृध्द होताल. कवयित्री शांता शेळके यांच्या समवेतच्या आठवणीही त्यांनी सांगितल्या.

वि. वा.शिरवाडकर , न. भि. जोशी , डॉ.अशोक कामत, ज्येष्ठ समीक्षक द. भि. कुलकर्णी यांचा ही सहवास लाभला. मुद्रक म्हणून १६३० पुस्तके प्रकाशित केले. मनन, चिंतन, वाचन नवोदित साहित्यिकांनी करावे. ३६ साहित्यिकांच्या सहवासावर आधारित पुस्तक लिहिले आहे .

यावेळी व्याख्यान मालेचे केंद्र कार्यवाह डॉ.बाळकृष्ण लळीत यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. के. सी. मोहिते यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. यावेळी मराठी विभागाचे प्रा. डॉ. राजाभाऊ भैलूमे, हिंदी विभागाचे प्रा. डॉ. ईश्वर पवार, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. क्रांती गोसावी यांनी केले. आभार प्रा. डॉ. ईश्वर पवार यांनी मानले .

# महाशिवरात्रीची पूजा आणि संपूर्ण विधी

**यंदा बुधवार २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री असून, शिवपुराणानुसार या दिवशी महादेवाची विधिव्रत पूजा केल्याने तसेच व्रत ठेवल्याने विशेष फळ प्राप्त होते. महाशिवरात्रीला अशाप्रकारे करा महादेवाची पूजा. जाणून घ्या संपूर्ण पूजा विधी, महत्व आणि कथा**

भारतमध्ये सर्वत्र महाशिवरात्रीला उपवास केला जातो. शरीर शुद्धीकरणासाठी उपवास केले जातात. ठराविक प्रमाणात घेतलेला ठराविक आहार शरीरावर विशिष्ठ परिणाम करतात. म्हणून शरीर शुद्धीकरणासाठी आणि मन सजग आणि शांत बनते. काहीजण दूध आणि फळे खाऊन उपवास करतात तर काहीजण निव्वळ पाणी पिऊन उपवास करतात. थोडीशी फळे आणि पाणी पिऊन उपवास करावा किंवा पचायला हलका आहार घेऊन उपवास केल्याने शरीर सुदृढ रहाते. उपवासासोबत रात्रभर आराधना, प्रार्थना आणि ध्यान करत जागरण करावे. महाशिवरात्रीच्या रात्री किंवा दुसऱ्या दिवशी उपवास सोडावा.



या दिवशी संपूर्ण दिवस उपवास करावा. महाशिवरात्रीदिनी प्रत्येक प्रहराच्या वेळी आणि निशीथकालात यशाशक्ती शिवपूजा करावयाच्या असतात. पहिल्या प्रहरात श्रीशिवाय नमः असा नामोच्चार करावा. दुसऱ्या प्रहरात श्रीशंकराय नमः असे म्हणावे. निशीथकाली श्रीसांबसदाशिवाय नमः असे जपावे. तिसऱ्या प्रहरात श्रीमहेश्वराय नमः आणि चौथ्या प्रहरात श्रीरुद्राय नमः असा नामोच्चार करून समर्पण करावे. तसेच शंकराला पंचामृत अर्पण करावे. पंचामृतानंतर शिवलिंगावर रुद्राभिषेक करावा. यानंतर गंध, अक्षता, फुले वहावित. नैवेद्य दाखवून शंकराचे नामस्मरण करावे.

**घरी अशी करा पूजा**

घरी महादेवाची पिंड किंवा प्रतिमा असेल तर चौरंगावर विधीवत ठेऊन पूजा मांडावी. पिंड किंवा प्रतिमा नसेल तर वाळूची पिंड मांडून पूजा करावी. पहाटे स्नान करून पूजा करावी. या पूजेला देवाला अभ्यंगस्नान घालावे. बेल, पांढरी फुले व रुद्राक्षांच्या माळा शिवपिंडीवर वाहाव्यात. शिवपिंडीला थंड पाणी, दूध किंवा पंचामृतानी स्नान घालावे. ॐ नमः शिवायसह शिवस्मरणात जागरण करावे. शिवपूजेत हळद-कुंकू न वापरता भस्म वापरावा, तर शिवपिंडीला पूर्ण प्रदक्षिणा न घालता अर्धचंद्राकृती प्रदक्षिणा घालतात. नैवेद्य दाखवावा आणि निरांजन ओवाळावं आणि आरती करावी.

**असा घ्यावा व्रत संकल्प**

महाशिवरात्रीच्या दिवशी सकाळी लवकर उठून स्नान करून पवित्र झाल्यानंतर कपाळावर भस्माचा त्रिपुंड टिळा लावावा आणि गळ्यात रुद्राक्षाची माळ घालावी. त्यानंतर मंदिरात जाऊन महादेवाची पूजा करवी. व्रत संकल्प घेताना खालील मंत्राचा उच्चार करावा -

शिवरात्रिव्रतं ह्येतत् करिष्येहं महाफलम्।
निर्विघ्नमस्तु मे चात्र त्वत्प्रसादाज्जगत्पते।।

त्यानंतर हातामध्ये फुल, अक्षता घेऊन शिवलिंगावर अर्पित करताना खालील मंत्राचा उच्चार करावा.

**देवदेव महादेव नीलकण्ठ नमोस्तु ते।**
**कर्तुमिच्छाम्यहं देव शिवरात्रिव्रतं तव।।**
**तव प्रसादाद्देवेश निर्विघ्नेन भवेदिति।**
**कामाद्या: शत्रवो मां वै पीडां कुर्वन्तु नैव हि।।**

**अशाप्रकारे महादेवाची रात्री करा पूजा**

दिवभर शिव मंत्र (ॐ नम: शिवाय)चा जप करून निराहार उपवास करावा (रोगी, अशक्त आणि वृद्ध दिवस फलाहार) करू शकतात. शिवपुराणामध्ये रात्रीच्या चार प्रहरात शिव पूजा करण्याचे विधान आहे. संध्याकाळी स्नान करून महादेवाच्या मंदिरात जाऊन किंवा घरातच पूर्व किंवा उत्तर दिशेला मुख करून बसावे आणि खालील मंत्राचा उच्चार करून संकल्प घ्यावा.

ममाखिलपापक्षयपूर्वकसलाभीष्टसिद्धये शिवप्रीत्यर्थंच शिवपूजनमहं करिष्ये

महादेवाला फळ, फूल, चंदन, बिल्वपत्र, धोतरा अर्पण करून, धूप-दीप लावून रात्री चारही प्रहर पूजा करावी. जल आणि पंचामृताने शिवलिंगाला अभिषेक करावा. भव, शर्व, रुद्र, पशुपति, उग्र, महान, भीम आणि ईशान या नावांचा उच्चार करून फुल अर्पण करावे. त्यानंतर आरती करावी. खालील मंत्राचा उच्चार करून प्रार्थना करावी -

**नियमो यो महादेव कृतश्चैव त्वदाज्ञया।**
**विसृत्यते मया स्वामिन् व्रतं जातमनुत्तमम्।।**
**व्रतेनानेन देवेश यथाशक्तिकृतेन च।**
**संतुष्टो भव शर्वाद्य कृपां कुरु ममोपरि।।**

दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा स्नान करून महादेवाची पूजा करून व्रत सोडावे.

# स्कूल बसेससाठी नियमावली लागू करणार

**मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती | अभ्यासासाठी एक सदस्यीय समितीची नियुक्ती**

**मुंबई : प्रतिनिधी**

**शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खासगी स्कूल बसेस साठी येत्या नवीन शैक्षणिक वर्षापासून नियमावली निश्चित करण्यात येणार आहे . त्यासाठी निवृत्त परिवहन अधिकारी जितेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमण्यात आली असून त्यांना पुढील एक महिन्यांमध्ये या संदर्भातला अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.**

संपूर्ण राज्यांमध्ये शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या हजारो स्कूल बस खासगी संस्थांच्या मार्फत चालवण्यात येतात. या स्कूल बसच्या माध्यमातून अनेक संस्थाचालक पालकांची आर्थिक लुबाडणूक करत असल्याच्या तक्रारी परिवहन विभागाला प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने आज परिवहन विभागामध्ये राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. त्यामध्ये येत्या शैक्षणिक वर्षापासून या स्कूल बसेस साठी नवी नियमावली निश्चित करण्यासाठी निवृत्त परिवहन अधिकारी जितेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमण्यात आली असून या समितीने आपला अहवाल पुढील



एक महिन्यांमध्ये सादर करावयाचा आहे. तसेच या संदर्भात सन २०११ मध्ये विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या रिक्षाचालकांची मनमानी रोखण्यासाठी मदान समितीने ज्या उपाययोजना सुचवल्या होत्या त्या देखील विचारात घेतल्या जाणार आहेत. या सर्वंकश अहवालाच्या अनुषंगाने नवीन शैक्षणिक वर्षापासून स्कूल बसेस साठी नियमावली निश्चित केली जाणार आहे.

राज्य भरात स्कूल बसेस ज्या संस्थाचालकांच्या माध्यमातून चालवल्या जातात, त्यासंदर्भात अनेक तक्रारी पालकांच्या कडून परिवहन विभागाला प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने शैक्षणिक वर्षाच्या एकूण कालावधी पैकी १० महिने या स्कूल बसेस विद्यार्थी वाहतूक करतात. परंतु प्रत्यक्षामध्ये पूर्ण वर्षाचे शुल्क एकाच वेळी संबंधितांकडून आकारले जाते. ते अवाजवी आहे. तसेच शालेय शुल्क व स्कूल बस शुल्क एकाच वेळी पालकांकडून आकारले जात असल्यामुळे त्याचा प्रचंड मोठा आर्थिक बोजा पालकांच्या वर पडतो. जे अत्यंत अन्यायकारक आहे असे अनेक पालकांचे म्हणणे होते. त्याऐवजी संबंधित स्कूल बस चालकांनी केवळ दहा महिन्यासाठीचा विद्यार्थी वाहतुकीचे शुल्क एकाच वेळी न घेता दर महिन्याला स्वीकारावे असे मत पालकांनी व्यक्त केले आहे.

**विद्यार्थ्यांची सुरक्षितता महत्वाची**

मध्यंतरी पनवेल आणि बदलापूर सारख्या ठिकाणी घडलेल्या घटना या अत्यंत अप्रिय आणि धोकादायक असून विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता प्रत्येक बस मध्ये पॅनिक बटन ,आग प्रतिबंधक स्पिंकलर, जीपीएस यंत्रणा, सीसीटीव्ही कॅमेरा आदी उपकरणे असणे आवश्यक आहे. तसेच ज्या संस्था अथवा स्कूल बस चालवणारे चालक पालकांच्या कडून विद्यार्थी वाहतुकीची शुल्क आकारतात, त्यांच्याकडे बसेस मधील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे एकात्मिक नियंत्रण असणे आवश्यक आहे. जेणेकरून बसमध्ये भविष्यात विद्यार्थ्यांच्या बाबतीत कोणतीही अप्रिय दुर्घटना घडणार नाही. या सर्व सूचनांचा विचार करून पाटील समितीने आपला अहवाल सादर करावा अशा सूचना मंत्री सरनाईक यांनी दिल्या आहेत.

# भाळवणीत बुधवारी महाशिवरात्रीचा उत्सव

■ गुरुवारी नामांकित कुस्त्यांचा आखाडा
■ विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**भाळवणी : प्रतिनिधी**

**येथील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या ग्रामदैवत नागेश्वराचा उद्या बुधवारी शिवरात्रीनिमित्त उत्सव संपन्न होणार आहे.यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून गुरुवारी नामांकित कुस्त्यांचा आखाडा रंगणार आहे.**



आज मंगळवारी मध्यरात्री भगवान नागेश्वरांना मध्यरात्री लघुरुद्राभिषेक करण्यात आला. महाशिवरात्रिनिमित्त दुपारी शाहीर निजामभाई शेख यांचे भेदिक त्यानंतर संतदास महाराज मनसुख यांचे हरिकीर्तन होणार आहे. तर रात्री पूनम कुडाळकर यांचा परंपरा महाराष्ट्राची हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. यानंतर छबीला मिरवणूक व फटाक्यांची आतीषबाजी होणार आहे.

गुरुवारी दुपारी कुस्त्यांचा भव्य आखाडा रंगणार आहे.या कुस्ती आखाड्याला अनेक वर्षांची जुनी परंपरा व नामवंत मल्लांचा वारसा लाभलेला आहे. सायंकाळी नामवंत लावणी सम्राट मयुरी उत्तेकर यांच्या लावण्यांचा कार्यक्रम होणार आहे या सर्व कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन नागेश्वर ट्रस्ट व भाळवणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ८ मार्चला बीड जिल्ह्यात काँग्रेसची सद्भावना पदयात्रा

**९ मार्च रोजी बीड शहरात मेळाव्याने समारोप | हर्षवर्धन सपकाळ यांची माहिती**


**मुंबई : प्रतिनिधी**

**महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, क्रांतीसूर्य महात्मा फुले, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा बस्वेश्वर, चक्रधर स्वामी या महापुरुषांचा व जगद्गुरु संत तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर माऊली, संत गाडगे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्यासह महान संतांच्या विचाराचा वारसा लाभलेला आहे.** पुरोगामी विचाराच्या महाराष्ट्राने कायमच देशाला दिशा दिलेली आहे. परंतु मागील काही दिवसात राज्यातील सामाजिक वातावरण बिघडलेले दिसत आहे. महाराष्ट्राची उज्ज्वल संस्कृती व परंपरा लक्षात घेऊन सद्य परिस्थितीत बंधुभाव व सामाजिक सौहार्द वाढवण्यासाठी व महाराष्ट्र धर्म जागवण्यासाठी सद्भावनेची गरज आहे. म्हणून काँग्रेस पक्षाने सद्भावना पदयात्रेचे आयोजन केले आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे.

टिळक भवन येथे पत्रकार परिषदेला संबोधित करताना काँग्रेस प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सद्भावना पदयात्रेबद्दल सविस्तर माहिती दिली, ते पुढे म्हणाले की, इंग्रजांना देशातून बाहेर काढताना केवळ राजकीय स्वातंत्र्यच नाही तर व्यवस्था परिवर्तनाचाही महत्वाचा भाग होता. स्वातंत्र्याच्या आधीपासून असलेल्या काँग्रेस पक्षाच्या डीएनएमध्येच समाजवाद आहे. जाती भेदाच्या पलिकडे पाहण्याचा वारसा काँग्रेस पक्षाला वारसा लाभलेला आहे. सामाजिक सद्भावनेचा तोच वारसा आपल्या संविधानातही आलेला आहे. एकीकडे संस्कृती, परंपरा व जाज्वल्य इतिहास आहे तर दुसरीकडे काही लोक आपल्या फायद्यासाठी जातीभेदाचे विष पसरवून सामाजिक भेद निर्माण करत आहेत हे अत्यंत दुर्देवी असून महाराष्ट्राच्या हिताचे नाही. यात बीड जिल्ह्याचा वारंवार उल्लेख होत आहे. या जिल्ह्यात स्त्री-पुरुष लोकसंख्येच्या गुणोत्तरात ही मोठी तफावत आहे. स्त्री भ्रूण हत्येचा प्रश्न या जिल्ह्यात ऐरणीवर होता.

# चाकूचा धाक दाखवून लुटणारे आरोपी जेरबंद

**सापळा रचून आरोपी ताब्यात | साडेतीन लाखांचा मुद्देमाल हस्तगत**




**नगर : प्रतिनिधी**

**पाथर्डी व नेवासा येथे महिलांना चाकूचा धाक दाखवून लूटमार करणारा आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले आहे. त्याच्याकडून ३ लाख ५० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ताब्यात घेतलेल्या संशयित आरोपीला पाथर्डी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सचिन ईश्वर भोसले (वय २५, रा.बेलगाव, ता.कर्जत, जि.अहिल्यानगर), एका अल्पवयीन मुलगा (वय १७, रा.बेलगाव, ता.कर्जत), असे ताब्यात घेतलेल्या संशियत आरोपींची नावे आहेत.**

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना मिळालेल्या माहितीनुसार सचिन भोसले याने चाकूचा धाक दाखवून लूटमार केल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून बेलगाव परिसरातून त्यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने पाथर्डी तालुक्यात सांगवी, करोडी व मालेवाडी परिसरात पैरेदार उमरका भोसले, गाडेकर झारक्या चव्हाण, (दोन्ही रा.नवी नागझरी, ता.गेवराई, जि.बीड), (दोघे पसार) यांनी केला असल्याचे तपासात समोर आले आहे.

(पान १ वरून)

### मायडीयाचा पंकज यादव लिंगपिसाट!

केले. मात्र पैसे घेण्यास महिलेने नकार दिल्यानंतर तु मला फार आवडते असे म्हणत ऋषीपाल याने पिडीतेचा हात धरून लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केल्याचे फिर्यादीमध्ये नमुद करण्यात आले आहे. वर्कमॅनपाठोपाठ कंपनीचा लिंगपिसाट एच आर पंकज यादव याचाही त्याच महिलेवर डोळा होता. तो महिलेस मला तुला भेटायचे आहे, तु रस्ता बदलला, तु मला खुप आवडतेस असे वारंवार म्हणत असे. तुझया मुलांना कंपनीत नोकरीस लावतो असे अमिष दाखवत पंकज वारंवार पिडीतेची छेड काढत असे. कंपनीतील वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून होणारा अन्याय सहन न झाल्याने पिडीतेने ऋषीपाल सिंग व पंकज यादव यांच्याविरोधात विनयभंगाची फिर्याद दाखल केली.

### प्रधानमंत्री सहाय्यता निधीत खा. नीलेश लंके एक नंबर!

खा. नीलेश लंके यांच्याकडे दररोज अनेक रूग्ण किंवा त्यांचे नातेवाईक उपचारासाठी मदत मिळावी यासाठी येतात. खा. लंके हे रूग्णाच्या आजाराची माहीती घेऊन मुख्यमंत्री अथवा पंतप्रधान सहाय्यता निधीतून त्यास मदत मिळेल का याची खात्री करतात. संबंधित आजार दोन्ही योजनांच्या निकषामध्ये बसती नसतील तर लंके हे स्वत: धर्मदाय रूग्णालयांशी संपर्क करून त्या रूग्णावर उपचार करण्याची व्यवस्था करतात. वेळप्रसंगी सामाजिक संस्थांशी संपर्क करून संबंधित रूग्णास मदत मिळवून देण्यासाठीही लंके यांची धडपड असते.

# पीएचडी करताना योग्य कौशल्ये आत्मसात करा

## संशोधक संतोष पागिरे यांचा सल्ला | पारनेर महाविद्यालयात मार्गदर्शन सत्र

**पारनेर : प्रतिनिधी**

**पीएचडीमुळे करिअरच्या संधी नक्कीच वाढतात मात्र त्यासोबत योग्य कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे असा सल्ला पारनेर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व संशोधक संतोष पागिरे यांनी दिला.**

पीएचडी संशोधन बदलत्या काळाची गरज या विषयावर पारनेर महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष व रसायनशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रामध्ये डॉ. पागिरे यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. पागिरे म्हणाले, केमिस्ट्री किंवा इतर विज्ञान शाखांमध्ये पीएचडी केल्याने संशोधन, अध्यापन, औद्योगिक क्षेत्र तसेच नव उद्योजकतेसाठी मोठया संधी उपलब्ध होतात. मात्र पीएचडी करताना योग्य दिशेने मार्गदर्शन करणेही तितकेच महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. या सत्रामध्ये इंडस्ट्रीमध्ये पीएडीधारकांचे महत्व, स्टार्टअप सुरू करण्याच्या संधी, शासकीय व खाजगी फंडीग सुविधा, पेटंटस प्रक्रिया आदी मुद्यांवर विद्यार्थ्यांनी प्रश्न उपस्थित केले. डॉ. पागिरे यांनी शंकांचे निरसन केले.



पीएचडी संशोधन बदलत्या काळाची गरज या विषयावर पारनेर महाविद्यालयात विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

### प्रदिर्घ आणि चिकाटीचा प्रवास

**फक्त पदवी मिळविणे पुरेसे नाही तर त्या ज्ञानाचा उपयोग करण्याची क्षमता असणे महत्वाचे आहे असे सांगतानाच डॉ. पागिरे यांनी विद्यार्थ्यांना पीएचडी करताना येणाऱ्या आव्हानांवरही प्रकाश टाकला. त्यांनी स्पष्ट केले की संशोधन हा प्रदिर्घ आणि चिकाटीचा प्रवास असून योग्य दिशेने परिश्रम घेतल्यास त्याचा उपयोग करिअर वाढविण्यासाठी करता येतो असे सांगितले.**

संशोधन संस्कृती रूजविण्यासाठी अशा कार्यक्रमांची आवष्यकता आहे. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता नाविन्यपूर्ण संशोधनाकडे लक्ष दिले पाहिजे असे मत समन्वयक प्रा. भाऊसाहेब नरसाळे यांनी सांगितले. प्रा. सागर म्हस्के यांनी सुत्रसंचलन केले. यावेळी डॉ. दिलीप ठुबे, डॉ. राहुल डिग्गीकर, अनिल ढोले, प्रविण डौले, प्रा.सरिता कुंडलीकर, अश्विनी ठुबे, विद्या शेळके, वैष्णवी दुधाडे, डॉ.मनिषा देवकाते आदी उपस्थित होते.

### सखोल संशोधन प्रक्रिया

**पीएचडी ही केवळ शैक्षणिक पात्रता नाही तर सखोल संशोधन प्रक्रिया आहे. ती एखाद्याच्या विचारशक्तीला व संशोधन क्षमतेला आकार देते. योग्य मार्गदर्शन आणि विषयातील सखोल ज्ञान असल्यास पीएचडी धारकांना देश-विदेशातील नामांकित संशोधन संस्थांमध्ये, मल्टीनॅशनल कंपन्यांमध्ये, शैक्षणिक क्षेत्रात मोठया संधी उपलब्ध होतात.**

**डॉ. तुकाराम थोपटे**
उपप्राचार्य

# निरंकारी परिवाराकडून स्वच्छता मोहिम

## स्वच्छ जल, स्वच्छ मन कार्यक्रमाचे आयोजन

**पुणेवाडी : प्रतिनिधी**

**रविवार दि. २३फेब्रुवारी रोजी पारनेर येथील संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या माध्यमातून पारनेर तालुक्यातील निरंकारी परिवाराच्या वतीने प्रोजक्ट अमृत अंतर्गत व स्वच्छ जल, स्वच्छ मन या कार्यक्रमांतर्गत गणेशखिंड तलावाची स्वच्छता केली.**

गणेशखिंड येथील या तलावातून पुणवाडी ग्रामपंचायतीची पाणी योजना राबविण्यात आलेली आहे. या तलावात कचऱ्याचे मोठे साम्राज्य निर्माण झाल्याने त्याची स्वच्छता करण्याचे अभियान निरंकारी परिवाराच्या वतीने राबविण्यात आले. सकाळी ७ ते दुपारी १२ या वेळेत तलाव परीसर स्वच्छता तसेच जलसाठा स्वच्छता अभियान राबविण्यात आले. संत निरंकारी मंडळाच्या सेवेकऱ्यांनी या परिसरातील प्लॅस्टिक, जुने कपडे, पाला पाचोळा संकलीत करून परिसर चकाचक केला.



संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन सामाजिक कार्यामध्ये देशभर अग्रेसर आहे. दुर्लक्षित क्षेत्रांचे भरभराटीच्या लघु-जंगलांमध्ये रूपांतर करून जंगलतोडीस तोड देण्यासठी हा नाविन्यपूर्व उपक्रम सुरू करण्यात आला. संपूर्ण देशभर शेकडो परिसंस्थांसह वननेस व्हॅन जैव विविधतेला चालना देत आहेत. पर्यावरणाला पुनर्संचयित करत आहेत. गेल्या चार दशकात निरंकारी परिवाराचे सदस्य भारतभर नियमितपणे रक्तदान शिबिरांची मोहिम आयोजित करतात. एक अग्रगण्य रक्तदान संस्था म्हणून निरंकारी ट्रस्टकडे पाहिले जाते. संत निरंकारी चॅरीटेबल फाउंडेशनच्या वतीने यापूव गुणवंतांसाठी आर्थिक मदत देण्यासाठी शिष्यवृत्ती योजनाही सुरू करण्यात आली होती. या चॅरीटेबल ट्रस्टला मानवतावादी सेवेबददल पुरस्कार देउन सन्मानीत करण्यात आलेले आहे.

### विविध क्षेत्रात योगदान

**सन २०१० मध्ये स्थापन झालेल्या संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन हे त्यांच्या धर्मदाय प्रकल्पांदवारे समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये योगदान देत आहे. दवाखाने, डायलिसिस केंद्र, नेत्ररोग केंद्र, प्रयोग शाळा आदी आरोग्य सेवांचा त्यात समावेश आहे. लाखो रूग्णांनी आजवर त्याचा लाभ घेतला आहे.**

# मढी ग्रामपंचायतचा पारनेरात निषेध

## मुस्लिम बांधवांना यात्रोत्सवात बंदी



पारनेर शहरातील संविधान व लोकशाही जागर समितीच्या वतीने मढी ग्रामपंचायतचा निषेध करणारे निवेदन प्रांताधिकारी श्रीकुमार चिंचकर यांना सादर करण्यात आले.

**पारनेर : प्रतिनिधी**

**राज्यात प्रसिध्द असलेल्या मढी येथील यात्रोत्सवात मुस्लिम व्यापाऱ्यांना बंदी घालण्याचा ठराव मढी ग्रामपंचायतीने केला असून त्याचा पारनेर शहरातील संविधान व लोकशाही जागर समितीच्या वतीने निषेध करण्यात आला. समितीचे अध्यक्ष सचिन नगरे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मंगळवारी प्रांताधिकारी श्रीकुमार चिंचकर यांची भेट घेऊन निषेध नोंदविणारे निवेदन सादर केले.**

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, मढी, ता. पाथर्डी येथील ग्रामपंचायतने मढी येथील यात्रोत्सवात मुस्लिम बांधवांना व्यवसाय करण्यास बंदी घालण्याचा ठराव केला आहे. सदरचा ठराव हा जातीय सलोखा बिघडविणारा असून समाजा-समाजामध्ये तंटे-तेढ निर्माण करणारा आहे. मढी ग्रामपंचायतीने केलेला हा ठराव हा असंविधानिक व घटनाबाहय आहे. भारतीय संविधानाच्या कुठल्याही मुलभूत अधिकार व घटनेच्या संविधानाच्या उददेशकामध्ये, तत्वामध्ये किंवा मुल्यांमध्ये न बसणारा हा ठराव आहे. हा ठराव करणा-या व जातीय तेढ निर्माण करणाऱ्या मढी ग्रामपंचायत पदाधिकारी व अधिकारी यांचा संविधान व लोकशाही जागर समितीच्या वतीने निषेध करण्यात येत असल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

निवेदनावर समितीचे अध्यक्ष सचिन नगरे, ॲड. सचिन पठारे, बलभीम कुबडे, दिपक पठारे, अविनाश औटी, दादा शेटे, अविनाश औटी, सुनील शिंदे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# महसूल सहाय्यकपदी निवड झाल्याबद्दल सत्कार

## श्री.मुलिकादेवी महाविद्यालयाचा पुढाकार

**निघोज : प्रतिनिधी**

**स्पर्धा परीक्षेमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून महसूल सहाय्यक म्हणून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना श्री. मुलिकादेवी महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.**




महसूल सहाय्यकपदी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा श्री. मुलिकादेवी विद्यालयात सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने हा प्रेरणादायी उपक्रम आयोजित करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमांत मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी स्वप्नील सालके, सचिन पवळे, प्राजक्त तांबे, किरण कर्डिले या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. आहेर म्हणाले, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रेरणा मिळावी या हेतूने अशा कार्यक्रमांचे वारंवार आयोजन करण्यात येते. स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी मार्गदर्शन, नियोजनबध्द अभ्यासक्रम, सराव परीक्षा आणि प्रेरणादायी व्याख्याने यामुळे महाविद्यालयाचे मार्गदर्शन केंद्र विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

सत्कारमुर्ती स्वप्नील सालके व प्राजक्त तांबे यांनी यशस्वी प्रवासाबद्दल मनोगत व्यक्त केले. स्पर्धा परीक्षेच्या तयारीतील आव्हाने, योग्य अभ्यास पध्दती आणि आत्मविश्वास यावर भर देण्याचा सल्ला दिला. कठोर परिश्रम, सातत्य आणि योग्य मार्गदर्शन महत्वाचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. प्रवीण जाधव, प्रा. अशोक कवडे, ईश्वर म्हस्के, प्रा. सचिन निघुट, प्रा. दीपक खामकर, प्रा. प्रवीण सरडे, प्रा. अपेक्षा लामखडे, प्रा. हर्षदा पंडित, प्रा. पुनम गंधाक्ते, प्रा. अमृता दौंडकर, प्रा. नम्रता थोरात, प्रा. रूपाली गोरडे, प्रा. निकीता सुरोशे, प्रा. सुप्रिया लंके आदी प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. निलिमा घुले यांनी प्रास्ताविक, प्रा. आनंद पाटकेकर यांनी सुत्रसंचलन तर स्वप्नील शेळके यांनी आभार मानले.

# नारायणगव्हाणमध्ये आ. दाते यांची पेढेतुला

## महायुती कार्यकर्त्यांची नवसपुर्ती

**नारायणगव्हाण : प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणूकीत आ. काशिनाथ दाते हे विजयी व्हावेत यासाठी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी केलेली नवसपुर्ती नारायणगव्हाण येथील चुंभळेश्वर मंदिरात आ. दाते यांची पेढेतुला करून करण्यात आली.**




महायुतीचे बाळासाहेब चव्हाण, काशिनाथ नवले, अण्णा चव्हाण, संजय शेळके, बाळासाहेब नवले, अण्णासाहेब नवले, सतिश चिपाडे, दगडू हारदे यांनी दाते यांच्यासाठी चुंभळेश्वराला साकडे घातले होते. विधानसभा निवडणूकीत दाते हे विजयी झाल्याने कार्यकर्त्यांनी मंदिरात पेढेतुला करून नवसपुत केली.

यावेळी बोलताना आ. दाते यांनी चुंभळेश्वर मंदिर देवस्थानचा शासनाच्या क वर्ग देवस्थान यादीत समावेश करण्यासाठी सर्व कागदपत्रांसह प्रस्ताव दाखल करण्याच्या सुचना दिल्या. प्रस्ताव दाखल झाल्यानंतर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत या प्रस्तावास मान्यता देण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी महसूल विभागात महसूल सहाय्यकपदी निवड झाल्याबद्दल आकाश बाळासाहेब शेळके यांचा आ. दाते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

नारायणगव्हाण ग्रामस्थांच्या वतीने आ दाते यांचा पुणेरी पगडी घालून सत्कार करण्यात आला. गणेश शेळके यांनी प्रास्ताविक तर काशिनाथ नवले यांनी आभार मानले.

यावेळी राहुल पाटील शिंदे, विक्रमसिंह कळमकर, दत्ता नाना पवार, सुनील थोरात, पंकज कारखिले, विश्वनाथ कोरडे, प्रशांत गायकवाड, वसंत चेडे, अमोल मैड, शंकर कांडेकर, सुषमा रावडे, सहादू शेळके, बंडोपंत नाईक, सुरेश बोऱ्हुडे, माणिक शेळके, अविनाश ठुबे, अरूण चिपाडे, दिलीप शेळके, काशिनाथ नवले, सुदाम नवले, गणेश विक्रम शेळके, शिवाजी भोसले, हसन शेख, गणेश डोमे, श्रीधर वाळूंज, तारा दरेकर, राहुल कांडेकर, चंदू कांडेकर, दादासाहेब शेळके, सविता भोसले, मंदा चव्हाण, मंगल चिपाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# आनंदाबाई तनपुरे यांचे निधन

## १०३ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील आनंदाबाई किसन तनपुरे यांनी वयाच्या १०३ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातू, नाती, पणतू असा मोठा परिवार आहे.**



धार्मिक कार्यात अग्रभागी असणाऱ्या आनंदाबाई या शिवसेनेचे निघोज-अळकुटी गटाचे गटप्रमुख बाबाजी तनपुरे व धार्मिक कार्यात अग्रभागी असणारे पवन महाराज तनपुरे यांच्या आई होत. वर्षभरापूर्वी आनंदाबाई यांचा १०२ वा अभिष्टचिंतन सोहळा तनपुरे परिवाराने मोठया उत्साहात साजरा केला होता. मुंबई, पुण्ययासह अहिल्यानगर जिल्हयातून आनंदाबाई यांना शुभेच्छा देण्यासाठी अनेक मान्यवरांनी हजेरी लावली होती. चार तास चाललेल्या या कार्यक्रमामध्ये पाहुण्यांचे आनंदाने स्वागत करत आनंदाबाई यांनी आलेल्या प्रत्येकाची दखल घेतली होती.

गेल्या तीन ते चार महिन्यांपासून प्रकृती अस्वस्थामुळे त्या सातत्याने विश्रांती घेणे पसंत करत होत्या. तनपुरे परिवार धार्मिक सांप्रदायात काम करत असून हे केवळ मातोश्रींचे संस्कार असल्याची प्रतिक्रीया निघोजकारांनी दिली.

# स्वराज्य वैभव संस्थेकडून माणिकगडाचे संवर्धन

## गेल्या आठ वर्षांपासून दुर्ग संवर्धन



**सुपा : प्रतिनिधी**

**रायगड जिल्हयातील माणिकगडावर स्वराज्याचे वैभव ही संस्था गेल्या आठ वर्षांपासून दुर्ग संवर्धनाचे काम करत असून या संस्थेच्या मावळयांनी अनेक ऐतिहासिक वास्तूंना पुर्नवैभव प्राप्त करून दिले आहे.**

अहिल्यानगरच्या शिवदुर्ग प्रतिष्ठानच्या मावळ्यांनी माणिकगड या मध्यम श्रेणीतील किल्ल्याला भेट दिली त्यावेळी मुंबई, ठाणे, रायगड परिसरातील स्वराज्याचे वैभव या संस्थेचे दुर्गप्रेमी गडाच्या संवर्धनाचे काम करत होते.

संस्थेचे अध्यक्ष अमित भदे यांनी सांगितले की, शिवछत्रपतींनी स्थापन केलेल्या स्वराज्याची प्रेरणा देणाऱ्या, छत्रपतींनी प्रत्यक्ष निवास गेलेल्या गडकोटांची भटकंती करण्याची आवड निर्माण झाल्यानंतर गडकोटांच्या वारीचा प्रवास सुरू झाला. प्रत्येक गडावर जाऊन वास्तूचे अभ्यासपूर्वक निरीक्षण करणे परतीच्या वाटेवर असताना गडावरील कचरा खाली घेऊन येणे ही बाब प्रत्येक मोहिमेम ठरलेली असते.

निवडक मित्रांच्या समूहापासून झालेली सुरूवात आणि आपणही गडाच्या संवर्धन कार्यात हातभार लावावा ही झालेली जाणीव हेच या संस्थेच्या स्थापनेचे उददीष्टय असल्याचे त्यांनी नमुद केले. दुर्ग अभ्यास मोहिम आयोजित करणे, संवर्धनासोबतच आजच्या तरूण पिढीला दुर्गाचे ऐतिहासिक महत्व लक्षात यावे या हेतूने अभ्यास मोहिम आयोजित करण्याचे काम ही संस्था करते. यावेळी वसंत सुरवसे, ठाकुरदास परदेशी, संजय साबळे, संतोष अडसरे, परमेश्वर भवर, शंकर गरड, सुनील खैरे, जगदिप शिंदे, किरण कवाद हे उपस्थित होते.

### मदतीसाठी कटीबध्द

**स्वराज्य वैभव या संस्थेचे मावळे तिनही ऋतूंमध्ये करत असलेले कार्य मोठे आहे. त्यांनी माणिकगडाला झळाळी प्राप्त करून दिली असून अनेक ऐतिहासिक गोष्टींवर त्यांनी प्रकाशझोत टाकला आहे. या संस्थेला शक्य ती मदत करण्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत.**

**सुरेंद्र शिंदे**
अध्यक्ष, शिवदुर्ग प्रतिष्ठान

### स्वराज्य वैभवचे कार्य

**गडावरील पाण्याच्या टाक्यांची सफाई, वाडयांच्या चौथाऱ्यांचे संवर्धन, गडाचे दरवाजे, पायऱ्यांचे संवर्धन, संवर्धन करताना सापडलेल्या वस्तूंचे संवर्धन, वृक्षारोपण, गड किल्यातील वस्तूंचे संवर्धन करण्यात येते.**

**अमित बदे, विशाल नायकोडी, कल्पेश मोटे**

# गुरूदेवमध्ये नेहरू विज्ञान केंद्राची प्रयोगशाळा!

## ६५४ विद्यार्थ्यांनी घेतला प्रात्यक्षिकांचा अनुभव

**सुपा : प्रतिनिधी**

**वरळी, मुंबई येथील नेहरू विज्ञान केंद्राची फिरती प्रयोगशाळा सुप्यातील गुरूदेव शिक्षण संकुलात दाखल झाल्यानंतर विद्यालयातील ६५४ विद्यार्थ्यांनी विविध विज्ञान प्रात्यक्षिकांचा अनुभव घेतला.**




वरळी येथील नेहरू विज्ञान केंद्राच्या फिरत्या प्रयोगशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध प्रात्यक्षिके दाखविण्यात आली.

या प्रयोगशाळेच्या माध्यमातून दाखविण्यात आलेल्या विविध प्रात्यक्षिकांतून विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासू वृत्ती आणि वैज्ञानिक दृष्टीकोन रूजविणे हा या उपक्रमामागील हेतू होता.

भौतिकशास्त्र, खगोलशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र यांसारख्या विविध शाखांमधील गुरूत्वाकर्षण बल, चुंबकीय बल, लहरींचे प्रकार, मानवी हृदयाचे कार्य, मानवी डोळयांमधील विकार, वातावरणीय दाब, न्यूटनचे नियम यांसारख्या विद्यार्थ्यांच्या जिज्ञासू वृत्तीला चालना देणारी विविध प्रात्यक्षिके या फिरत्या प्रयोगशाळेच्या माध्यमातून दाखविण्यात आली. विद्यार्थ्यांनी चौकसपणे प्रात्यक्षिके पाहून काही प्रश्नही उपस्थित केले. त्यास प्रयोगशाळेतील तज्ञांनी समर्पक उत्तरे दिली.

नेहरू विज्ञान केंद्राच्या या फिरत्या प्रयोग शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वेगवेगळी २० प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. विद्यार्थ्यांनी प्रत्येक प्रात्यक्षिकाचे बारकाईने निरीक्षण करून काही नोंदीही घेतल्या. प्रशालेतील सर्वच विद्यार्थ्यांनी या प्रयोगशाळेतील प्रयोगांची माहीती घेत या उपक्रमात यशस्वी सहभाग नोंदविला.

राज्य शासनाचा हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी वरळी, मुंबई येथील नेहरू विज्ञान केंद्राचे कर्मचारी तसेच गुरूदेव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संतोष मगर, प्राचार्य तुषार कदम यांच्यासह सर्व शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

### स्तुत्य उपक्रम

**वरळी, मुंबई येथील नेहरू विज्ञान केंद्राच्या पुढाकारातून फिरत्या प्रयोगशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध विज्ञान शाखेचे विविध प्रात्यक्षिके दाखवून विद्यार्थ्यांच्या जिज्ञासू बुध्दीला चालणा देणारा हा उपक्रम स्तुत्य आहे. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही फिरती प्रयोगशाळा निश्चित उपयोगी ठरेल.**

**संतोष मगर**
अध्यक्ष, गुरूदेव शिक्षण संस्था

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com